संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१.
19 MAY 2018
प्राप्त झाले सही.....

**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा उपसंचालक संवर्गातील अधिका-यांच्या तात्पुरत्या पदोन्नती व पदस्थापना.**

**महाराष्ट्र शासन**

वित्त विभाग,

शासन आदेश, क्रमांक :- संलेको २०१८/ प्र.क्र. १४ /कोषा प्रशा-२

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.दिनांक :- १८ मे, २०१८.

**शासन आदेश :** - महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहायक संचालक (गट- अ कनिष्ठ) संवर्गातील खालील विवरणपत्रामध्ये नमूद अधिकारी श्री. का. बा. गर्जे यांना महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा उपसंचालक (गट- अ वरिष्ठ) संवर्गात वेतनबँड रू. १५६००-३९१०० अधिक ग्रेड वेतन रु. ६६०० या वेतन श्रेणीतील पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

२. श्री. गर्जे यांच्या सेवानिवृत्तीस ०३ वर्षापेक्षा कमी कालवधी शिल्लक असल्याने, त्यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसुचना, दि. १५/६/२०१७ मधील तरतुदीनुसार महसुली विभागाकरीता सुट देण्यात प्राप्त आहे. श्री. गर्जे यांना त्यांनी विनंती केलेल्या महसुली विभागांपैकी कोकण महसुली विभागात, खालील तक्त्यातील स्तंभ क्र. ४ मध्ये नमुद पदावर तात्पुरत्या पदोन्नती नंतरची पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | वाटप करण्यात आलेला महसुली विभाग | तात्पुरत्या पदोन्नतीने द्यावयाची पदस्थापना |
|---|---|---|---|
| | २ | ३ | ४ |
| १ | श्री. का. बा. गर्जे | सा.प्र.वि. अधिसुचना दि. १५/६/२०१७ नूसार महसुली विभाग वाटपातून सुट | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका |

३. सदर पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अधिन राहून भरण्याबाबत सा.प्र.वि. / १६ ब यांनी दि. २९/१२/२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांनूसार देण्यात येत आहे.

४. श्री. गर्जे यांना सहायक संचालक संवर्गात मंजूर करण्यात आलेल्या दि. ३१/८/२००३ या मानीव दिनांकच्या अनुषंगाने त्यांचा दि. १/१/२००४ व तद्नंतरच्या ज्येष्ठतासूच्यांमध्ये सुधारीत सुधारीत ज्येष्ठताक्रमांक निश्चित करावा.

५. सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असल्याने त्या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

६. वरील अधिका-यांना महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट- अ (वरिष्ठ) संवर्गात देण्यात आलेली पदोन्नती ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतील असल्यामुळे ती आयोगाच्या मान्यतेने नियमित करण्यात येईल.

७. वरील अधिका-यांनी आपल्या पदोन्नत पदाचा कार्यभार या आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत त्वरीत स्वीकारावा व तसे केल्याबद्दल कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्र या विभागाकडे पाठवावे. विहित कालावधीत नियूक्ती न स्विकारल्यास पदोन्नतीचे आदेश रद्द करण्यात येतील. तसेच श्री. गर्जे यांनी मत्ता व दायित्व प्रमाणपत्र सादर केल्याची खात्री संचालनालय (ले व को), मुंबई यांनी करावी.

८. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १६/२/२०१८ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदर अधिकारी यांची सदर पदावर पदोन्नतीने पदस्थापना दर्शविण्यात आली आहे.

९. सदर अधिकारी यांना शासन अधिसुचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही २०१७/ प्र.क्र.११४/कार्या-१२, दिनांक १५ जून, २०१७ मधील अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(मा. रा. गांधी)
अवर सचिव, वित्त विभाग

प्रत -:

१) महालेखापाल १ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय ,मुंबई *
४) संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई *
५) प्रधान सचिव (ले व को) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६) संबंधित अधिकारी *
७) संबंधित अधिकारी यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख.*
८) संबंधित अधिकारी यांचे पदोन्नतीच्या पदाचे कार्यालय प्रमुख*.
९) मा. मंत्री / मा. राज्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०) कक्ष अधिकारी,कोषा-प्र.१,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) निवड नस्ती. ,कोषा-प्र.२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

* (संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत)